**पुरचुंडी**



# रेडिओचे दिवस

■ **वसंत कऱ्हाडे**

काही संबंध नसलेल्या दोन गोष्टी असतात. पण एकामुळे दुसरी लक्षात राहते. मी मुंबईत राहण्यास केव्हा आलो ती तारीख लक्षात नाही. पण त्यानंतर दोन दिवसांनी मुंबई गोदीत स्फोट होऊन आग लागल्याचे आठवते. (१४ एप्रिल १९४४) तसेच प्रथम रेडिओ केव्हा पाहिला किंवा जवळून केव्हा ऐकला तो दिवस काही आठवत नाही. परंतु ज्या नातेवाईकांकडे कुर्ला येथे मी रहात असे त्यांनी रेडिओ आणला आणि दोन दिवसांनी रा.स्व.संघावरील बंदी उठविण्यात आली हे लक्षात राहिले. (१२ एप्रिल १९४९)

गंगाधरकाकांनी आणलेला रेडिओ बुश कंपनीचा, काळ्या रंगाचा, एसी/डीसी करंटवर चालणारा, पाच व्हॉल्व्हचा व परदेशात तयार झालेला होता. तरी डायलवरच पेशावर, दिल्ली, कराची, मुंबई इ.इ. स्टेशने कोठे लागतात ती त्या त्या ठिकाणी छापलेली होती. स्टेशन दिसण्याकरीता डायलच्या बरोबरमध्ये डायल लॅन असे. हल्ली ही प्रथा बंद झाली आहे. एरियल आणि अर्थिंग अतिशय आवश्यक असे. तसेच रेडिओ ऑन केल्याबरोबर लगेच आवाज येत नसे. व्हॉल्व्ह पेटून लाल होत. मग आवाज येत असे. त्याकाळी रेडिओवर खरखर म्हणजे डिस्टर्बन्स फार येत असे.

रेडिओ आल्याबरोबर लगेच दुसऱ्या दिवशी मी एरियल आणि अर्थिंग बसवून घेतली. माझ्या वर्गमित्राच्या भावाचे रेडिओ विक्री आणि दुरुस्तीचे दुकान होते. त्याने मला एरियल–अर्थिंगचे काम करून दिले. ते मी नीट पाहून ठेवले. त्याचा पुढे फार उपयोग झाला.

काका सकाळी दहाला कामावर जात ते रात्री आठनऊला येत. त्यामुळे रेडिओ दिवसभर माझ्याच ताब्यात असे. घरातील व आजूबाजूचे शेजारी यांना ऐकण्यात इंटरेस्ट, पण कुणी हात लावत नसत. त्याचा मी पूर्ण फायदा घेतला. रेडिओ स्टेशन्स, कार्यक्रमाच्या वेळा, मराठी कार्यक्रम या सर्व गोष्टी पाठ झाल्या. त्यावेळी मिडियम आणि शॉर्ट वेव्ह हे दोनच बँडस असत. एफ.एम. ऐकूनही माहीत नव्हता.

त्यावेळी बडोदा स्टेशन लागत असे. त्यावर मराठी कार्यक्रम असत. संस्थाने विलिन झाल्यानंतर बडोदा स्टेशन बंद झाले. मात्र अहमदाबाद येथे केंद्र सुरू झाले. घोषणा करताना मात्र बडोदा–अहमदाबाद अशी फसवी घोषणा सुरू झाली. या अहमदाबाद केंद्राची आणखी एक आठवण आहे. त्यावेळी शंभर किलोवॅटचा नवा प्रक्षेपक अहमदाबाद येथे बसविण्याचे घाटत होते. मात्र तो मुळात मुंबई ब केंद्राकरीता मागविला होता. काही वर्तमानपत्रांनी या विरुद्ध बराच ओरडा केला. मुंबईतील नवशक्ती या दैनिकाने (नेहमीप्रमाणे) मात्र महाराष्ट्रीयन लोकांना अन्याय होतो म्हणून ओरडा करण्याची सवयच जडली आहे असे विचार मांडले.

आमच्याकडे त्यावेळी 'नवशक्ती' येत असे. आपण याला उत्तर द्यावे असे वाटले. मला लिहिण्याची आवड नाही. अक्षर वाईट, शुद्धलेखनात चुका भरपूर. यात अजूनही काही बदल झालेला नाही. तरी लिहिण्याचे ठरवले.

याचे आणखी एक कारण रेडिओ या माध्यमाविषयी वर्तमानपत्रांची अक्षम्य बेपर्वाई. त्याकाळी होती तशीच आजही आहे. थोडे विषयांतर करायचे तर टी.व्ही.चे कार्यक्रम पान भरून देणारी वर्तमानपत्रे रेडिओचे कार्यक्रम चार ओळीतही छापत नाहीत. टी.व्ही.वर काय कार्यक्रम आहेत ते टी.व्ही. लावताच समजते. सर्व कार्यक्रमांची माहिती प्रायोजकाद्वारे सतत चालू असते. रेडिओचे तसे नाही. म्हणून महाराष्ट्रभर वाचल्या जाणाऱ्या वर्तमानपत्रांनी महाराष्ट्रातील प्रमुख केंद्रांचे कार्यक्रम छापावेत. स्थानिक वर्तमानपत्रांनी स्थानिक रेडिओचे कार्यक्रम छापायला हरकत नाही.

अर्थात वर्तमानपत्रांनाच केवळ दोष देऊन चालणार नाही. रेडिओचे कार्यक्रम प्रेटा इन्फोर्मेशन ब्युरोतर्फे वर्तमानपत्रांना मिळतात. त्यांच्या कार्यपद्धतीबद्दल तर आनंदच आहे. त्यांच्याकडून कार्यक्रम मिळत नाहीत अशी



तक्रार आहे. असो.

तर मी आयुष्यात प्रथमच दोनतीन फूलस्केप असे सविस्तर पत्र 'नवशक्तीस' लिहिले. मात्र हे पत्र छापण्याकरीता नसून आपला गैरसमज दूर व्हावा म्हणून लिहिले आहे असे स्पष्ट लिहिले. पत्रात भरपूर पुरावे, उदाहरणे दिली होती. आश्चर्य म्हणजे नवशक्तीने संपादकीयात त्याचा उल्लेख करून वस्तुस्थिती मान्य केली. त्यावेळी श्रीकांत पालेकर संपादक असावेत असे वाटते. खात्री नाही. पुढे तो प्रक्षेपक मुंबई ब केंद्राकरीता बसविण्यात आला.

सर्व रेडिओ केंद्रे प्रादेशिक भाषेत घोषणा करीत असताना मुंबईच्या घोषणा मात्र हिंदीत असत. तो (कॉस्मोपॉलिटन शहर?) बदल बहुधा शांतीलाल शहा नभोवाणी मंत्री असताना झाला व घोषणा मराठीत सुरू झाल्या. बडोद्याप्रमाणेच औरंगाबाद केंद्रावर मराठी कार्यक्रम होत असत. मुख्य म्हणजे मराठी गाणी. कारण इतर कार्यक्रम फारसे लक्षात राहिले नाही. मराठी कार्यक्रम देणारे आणखी एक केंद्र म्हणजे गोवा रेडिओ. मध्यम लहरीप्रमाणेच लघुलहरीवर हे कार्यक्रम ऐकू येत. हे एक लोकप्रिय नभोवाणी केंद्र होते. मराठीप्रमाणेच सिंधी व हिंदी भाषेतही कार्यक्रम प्रसारित होत असत. चित्रपट संगीतावर अर्थातच जास्त भर होता. गोवा मुक्तीनंतर अर्थातच सर्व बदलले.

हिंदी चित्रपट संगीताकरीता त्या काळी लोकप्रियतेचा कळस गाठला तो रेडिओ सिलोननेच. आम्ही प्रथम सिलोन रेडिओ ऐकला तो संध्याकाळी ५ ते ७ या वेळेत. त्यावेळी सिकंदरदास म्हणून उद्घोषक होता. तो बहुधा बंगाली असावा. रेकॉर्डसही जास्त बंगाली लावल्या जात असत. मी थोड्या दिवसांकरीताच आहे असे तो वारंवार सांगत असे. तसेच मला हिंदी चांगले येत नाही हेही कबूल करीत असे. तो थोडे दिवसच होता.

पुढे ही वेळ बदलली व सकाळी ६ ते १० आणि रात्री ७ ते ११ अशी वेळ झाली. 'बिनाका गीतमाला'मुळे अजूनही सिलोन रेडिओ आठवतो. आता नाव बदलले असून श्रीलंका रेडिओ असे झाले आहे. रेडिओ सिलोनचा चित्रपट संगीतावरच भर असला तरी कार्यक्रमात विविधता होती. काही कार्यक्रमांची नावेच पहा – बदलते हुये साथी, जब मैं गा उठा, एकही फिल्म के गीत, एकही कलाकार के गीत, संदेश गीतावली, एस. कुमारका फिल्मी मुकदमा, मराठा दरबार गीतमाला, भुलेबिसरे गीत इ.इ. आठवड्यातून फक्त अर्धा तास पाकिस्तानी संगीत लागत असे. 'मराठी गीतोंका कार्यक्रम' आठवड्यात मंगळवारी पंधरा मिनिटे होत असे. अजूनही होतो.

सकाळी साडेसात ते आठ या वेळात पुरानी फिल्मों से हा जुन्या गाण्यांचा कार्यक्रम अजूनही चालू आहे. शेवटचे गीत के.एल. सैगलचेच असते. सैगलची रेकॉर्ड लागली की आठ वाजण्यास तीनचार मिनिटे आहेत असे घड्याळ न बघताच समजत असे. मृत झालेले संगीतकार, नट, गायक यांच्यावरील गीतांचा कार्यक्रम त्यांच्या मृत्युदिनी आठवणीने सादर केला जातो. पाश्चिमात्य संगीत आणि दाक्षिणात्य संगीताचे कार्यक्रमही त्याकाळी भरपूर प्रमाणात सादर केल्या जात असत.

मात्र आकाशवाणीला रेडिओ सिलोनची बरोबरी कधीच करता आली नाही. त्यातच सिनेनिर्माते आणि आकाशवाणी यांच्यामध्ये काही मतभेद झाले आणि आकाशवाणीने चित्रपट संगीत वाजविणे बंद केले. नेहमीप्रमाणे हे नाटक काही दिवस चालले आणि मतभेद मिटले. पण त्यामुळे रेडिओ सिलोनची लोकप्रियता वाढली. त्याला तोंड देण्याकरीता आकाशवाणीने विविध भारती सुरू केली. जाहिराती घेणार नाही असे सुरुवातीला जाहीर केले. त्याचवेळी आम्हा मित्रमंडळीत पैजा लागल्या की, जाहिराती नक्की घेणार. नेहमीच्या सरकारी धोरणाप्रमाणे माघार घेऊन जाहिराती सुरू झाल्या.

१९४८–४९ साली मी दादरला पेपर वाटण्याचे काम करीत असे. त्यावेळी 'आकाशवाणी' नावाचे एक इंग्रजी साप्ताहिक हातात आले. त्यात आकाशवाणीच्या भारतातील सर्व केंद्रांचे आठवड्याचे कार्यक्रम छापलेले असत. बी.बी.सी. वरून भारताकरीता होणारे हिंदी कार्यक्रम तसेच बी.बी.सी. (लंडन) वरून प्रसारित होणारे मराठी (होय मराठी) कार्यक्रमही छापलेले असत. परंतु हळूहळू महाराष्ट्रातील श्रोत्यांचा प्रतिसाद कमी होऊ लागला. मराठी वृत्तपत्रांमधून उदा. केसरी लोकांनी या कार्यक्रमाला पत्र पाठवून कार्यक्रम ऐकून प्रतिसाद द्यावा असे आवाहन केले गेले. परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही व हा कार्यक्रम बंद झाला. या कार्यक्रमाचा उल्लेख रमेश मंत्र्यांनी त्यांच्या एका प्रवासवर्णनात केला आहे.

केवळ मराठी कार्यक्रम बीबीसीवर का सुरू केले याचे उत्तर ती एका लढाऊ लोकांची भाषा आहे असे बीबीसीने दिल्याचे आठवते. इंग्रजी आकाशवाणी साप्ताहिकाप्रमाणेच हिंदी आणि गुजराथी भाषेतही द्विसाप्ताहिके निघत असत. त्यांची नावे मात्र आठवत नाहीत. मराठीत सरकारी प्रयत्न होणे शक्यच नव्हते. खाजगी प्रयत्न झाले आणि फसले. कालांतराने रेडिओ स्टेशन्स वाढली. परंतु या सर्व कार्यक्रमपत्रिका बंद पडल्या.

'आकाशवाणी' पत्रिकेचा मुख्य फायदा म्हणजे आठवड्याचे कार्यक्रम अगोदरच कळत आणि आकाशवाणी परदेशातील भारतीयांकरीता आणि परदेशातील स्थानिक श्रोत्यांकरीता जे कार्यक्रम प्रसारित करते त्याची माहिती मिळत असे. त्यावेळी हिंदी, गुजराथी आणि तमिळमधून असे कार्यक्रम होत. इंग्रजीतूनही पाचसहा तास कार्यक्रम होत. याखेरीज जुरक, अफगाण, चिनी, स्वाहिली, सिंहली इ. अनेक भाषांतून प्रसारण होत असे. या सर्व भाषेतील कार्यक्रमात हिंदी चित्रपट संगीत असेच. बीबीसीचा वर उल्लेख आला आहे त्याचप्रमाणे व्ही.ओ.ए. म्हणजे व्हॉइस ऑफ अमेरिकाही हिंदी प्रसारण करते. मॉस्को रेडिओवरूनही हिंदी, बंगाली, मराठी व आणखी काही भारतीय भाषांमधून कार्यक्रम होत असत. मात्र त्यात प्रसाराचा भाग जास्त असे. जर्मन (कलोन), इटली (रोम), अफगाणिस्तान, इराण इ. देशदेखील हिंदी कार्यक्रम प्रसारित करतात.

आमच्या एका मित्राकडे त्यावेळी एक मोठा इंपोर्टेड रेडिओ

आणला होता. त्याकाळी त्यावर श्रीनगर केंद्र ऐकू येत असे. घोषणा अशी असे, 'ये रेडिओ कश्मीर श्रीनगर है.' पाकव्याप्त काश्मीरचा आझाद काश्मीर रेडिओही त्याकाळी ऐकला. भारतीय पुढाऱ्यांना अर्वाच्य भाषेतील शिव्यांचा पाच मिनिटांचा एक कार्यक्रम या केंद्रावर होत असे. या कार्यक्रमाचे नाव 'ढोल के बोल' असेच काहीसे होते.

बीबीसी, व्हीओएला बरेच भारतीय श्रोते पत्रे पाठवीत. आता दूरदर्शनच्या जमान्यात लोक कितपत रेडिओ ऐकतात माहिती नाही. बीबीसी आणि जर्मन (कलोन) ही स्टेशने मध्यम लहरींवर काही वेळा ऐकू येतात. रेडिओ जपानवरही हिंदी कार्यक्रम होतात. त्या काळात आमची आवड म्हणजे हिंदी चित्रपट संगीत. त्यातही जुने. आकाशवाणीची एक उर्दू सर्व्हिस आहे. ही सकाळी, दुपार व रात्री असे अकरा ते बारा तास कार्यक्रम प्रसारित करते. मुख्यत: पाकिस्तानबरोबर भारतात ती ऐकल्या जाते. लोकप्रियताही आहे असे रेडिओला येणाऱ्या पत्रांवरून वाटते.

राष्ट्रीय प्रसारण सेवा संध्याकाळी साडेसहा ते पहाटे ६.१० पर्यंत मध्यम लहरीवर प्रक्षेपित केल्या जाते. हे कार्यक्रम दिल्ली स्टुडिओत होतात. केबलद्वारे नागपूरला येतात व तेथून प्रक्षेपित केल्या जातात. या शास्त्रीय संगीत, सुगम संगीत, कर्नाटकी संगीत, पाश्चिमात्य संगीत, भक्तीगीते, बातम्या इ. कार्यक्रम असतात.

पहाटे साडेचारपासून विश्ववाणी नावाचे रेडिओ केंद्र सुरू होते. त्यात पंधरा-पंधरा मिनिटे सर्व भारतीय भाषांमधून ख्रिश्चन धर्माचा प्रचार असतो. हे केंद्र सिलोनमधून चालविल्या जाते. मध्यम लहरीवर असूनही चांगले स्पष्ट ऐकू येते. असेच केंद्र सिबा रेडिओ म्हणून लघुलहरीवरही ऐकू येते. सर्व भारतीय भाषांत ख्रिश्चन धर्मप्रसार होतो.

१९४८-४९ सालची गोष्ट असावी. लघुलहरीवर अमरभूपाळी या चित्रपटातील गाणी ऐकू येऊ लागली. चाली मराठीतल्या, पण भाषा बंगाली होती. गाणी संपल्यावर घोषणा झाली. त्यावेळी कळले की, अमरभूपाळी बंगाली चित्रपटातील ती गाणी होती. गायिका अर्थातच लता मंगेशकर. पाकिस्तानच्या ढाक्का केंद्रावर ही गाणी लावली होती. आता मात्र पाकिस्तान आणि बांगलादेशही हिंदी चित्रपट संगीत बिलकूल लावत नाही. एवढेच नव्हे, तर हिंदी राग-रागिण्यांची नावे उर्दूमध्ये बदलण्याचा प्रयत्न चालू आहे असे ऐकतो.

मुंबई आकाशवाणी केंद्र बघण्याचा योग एकदा आला. माझ्या गोखले नावाच्या मित्राचे एक नातलग रेडिओ केंद्रात होते. बहुतेक पुरुषोत्तम जोशी. त्यामुळे शक्य झाले.

त्या काळची आणखी एक आठवण म्हणजे रविवारी सकाळी 'झलक' नावाचा कार्यक्रम सादर होत असे. त्यात संपूर्ण दिवसात प्रसारित होणारे कार्यक्रम प्रत्यक्षात थोडे थोडे ऐकवत असत. फक्त पाच मिनिटात. सकाळी ९ वा. पहिली सभा संपत असे. पाऊणेनऊ ते नऊ मराठी संगीत असे. त्यात बहुधा दोन गाणी होत. हल्लीच्या सुगम संगीताप्रमाणे. विविध भारतीवर पत्रोत्तरांचा कार्यक्रम असे. ज्यांच्या पत्रांना उत्तरे दिली जाणार आहेत त्यांना रेडिओ केंद्र पत्र टाकून अगोदर तारीख कळवित असे.

### काही गमतीजमती

एकदा एका मित्राबरोबर रेडिओ खरेदीला गेलो. पुणे केंद्र सुरू झालेले होते. पुणे केंद्र ऐकले. थोडी खरखर होती. अर्थिंग होती. अर्थिंग लावा, चांगले ऐकू येईल असे दुकानदाराने सांगितले. दुसऱ्या दिवशी मित्राकडे गेल्यावर मित्र म्हणाला की दुकानदाराने फसविले. सर्वच स्टेशनांवर खरखर येत होती. म्हटले धीर धर. काँक्रीट बिल्डिंगमध्ये काही ठिकाणी रेडिओ चांगला ऐकू येतो. काही ठिकाणी येत नाही. योग्य ठिकाणी रेडिओ ठेवून चांगले एरियल-अर्थिंग केले. गंमत म्हणजे दुकानापेक्षाही चांगले ऐकू येऊ लागले.

एका गृहस्थाकडे एरियल-अर्थिंग बसवून दिले. मिडियम, शॉर्टवेव्ह असे समजावून दिले. शेवटी लोकप्रिय म्हणून सिलोन लावून दाखविले. त्यावर ते गृहस्थ म्हणाले, एवढे एक स्टेशन लागणार नाही अशी काही व्यवस्था करता येईल काय? कारण मुले सिलोन ऐकतील व अभ्यास करणार नाहीत.

आमच्या घरी एक पाहुणे आले. संध्याकाळी मी रेडिओ लावला. एका मराठी चित्रपटातील गाणे चालू होते. कोणते स्टेशन पाहुण्यांनी विचारले. मी म्हटले, तुम्हीच ओळखा. त्यांना माहीत असलेली सर्व स्टेशने त्यांनी सांगितली. शेवटी मी म्हटले, हे मॉस्को स्टेशन आहे. गाणे संपल्यावर कळलेच. तसे कळल्यावर त्यांना आश्चर्यच वाटले.

माझ्या एका मित्राने चोरबाजारातून बॅटरी किंवा वीज न लागणारा क्रिस्टल सेट विकत आणला होता. आम्ही त्यात बऱ्याच सुधारणा केल्या. हेडफोन किंवा अगदी छोटा स्पीकर लावून तीनचार फूट इतका त्याचा आवाज येत असे. मुंबई अ, ब केंद्र ऐकू येत असे. बऱ्याच लोकांचा त्यावर विश्वास बसत नसे. ते कुठे छोटा सेल वगैरे लपविला नाही ना याची खात्री करून घेत.

पुण्याच्या आपटे नावाच्या गृहस्थांनी 'रेडिओ कसा खरेदी कराल?' या नावाचे मराठी माहितीपर पुस्तक प्रसिद्ध केले होते.

### आज २००५ साली...

महाराष्ट्रात आज जवळजवळ वीस नभोवाणी केंद्रे आहेत. मुंबई येथे आकाशवाणीची पाच केंद्रे आहेत. १) अस्मिता २) संवादिता ३) विविध भारती ४) एफ.एम. रेनबो ५) एफ.एम. गोल्ड व्यापारी चार केंद्रे आहेत. एफ.एम.वर. अस्मिता वाहिनी रोज सोळा-सतरा तास चालू असते. या वाहिनीवर १) सावरकर २) महानायक सुभाषचंद्र बोस ३) एक होती प्रभातनगरी ४) अत्तरसुगंध (कृ.द.दीक्षित/बापू वाटवे) ५) एक होता कार्व्हर ६) गंधर्वयुग इ. मालकांना प्रचंड प्रतिसाद मिळाला.

■

**वसंत कऱ्हाडे**